**विद्यापीठाचे विविध कार्यालयाचे मोडकळीस आलेल्या/ जिर्ण झालेल्या क्षतिग्रस्त इमारती विद्यापीठ निवासस्थाने जीर्ण मोडकळीस दुरूस्ती योग्य नसलेली वास्तु पाडण्याबाबतचे प्रस्तावावर विद्यापीठस्तरीय समिती गठीत करण्याबाबत..**

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

**कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)**

**प्रस्तावना -**

विद्यापीठाची स्थापना सन १९६९ मध्ये करण्यात आली आहे. व विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे विदर्भातील ११ जिल्हयामध्ये असून विद्यापीठाव्दारे शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाची कामे यशस्वीरित्या पार पाडली जात आहेत विद्यापीठामध्ये गेली ५० वर्षामध्ये विविध कार्यालयाचे बांधकाम / इमारती / कर्मचा-यांकरीता निवास्थाने इत्यादी सोई सुविधा विद्यापीठाचे जमीनीवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

विद्यापीठ स्थापनेपासुन काही इमारती /कार्यालये /निवास्थाने बांधण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत ती क्षतिग्रस्त, जीर्ण मोडकळीस दुरूस्ती योग्य नसलेली वास्तु पाडण्याबाबतचे प्रस्तावावर मंजुरीकरीता प्रस्ताव विद्यापीठाचे विविध कार्यालयाकडुन या कार्यालयास सादर केले जातात. त्यामुळे याबाबत धोरणात्मक, निर्णय घेणे अपेक्षित आहे. याकरिता विद्यापीठ स्तरावरील मोडकळीस आलेल्या/ जिर्ण झालेल्या इमारती, विद्यापीठ निवासस्थाने पाडण्या संबंधीचे प्रस्ताव लवकरात लवकर निकाली काढण्याचे दृष्टीने विद्यापीठ स्तरावर समिती गठीत करणेबाबतची बाब विद्यापीठ प्रशासनाचे विचाराधीन होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे विद्यापीठस्तरावर समितीचे गठन करून आदेश निर्गमित येत आहे.

**आदेश**

**जा.क्र. साप्रवि/जमिन/समिती / 353 /२०२४** **दिनांक : २१/०५/२०२४**

उपरोक्त पार्श्वभुमी लक्षात घेता असे आदेशित करण्यात येते की, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यापीठाचे विविध कार्यालयाचे मोडकळीस आलेल्या/ जिर्ण झालेल्या क्षतिग्रस्त इमारती विद्यापीठ निवासस्थाने जीर्ण मोडकळीस दुरूस्तीयोग्य नसलेली वास्तु पाडण्याबाबतचे प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकीय दृष्टीने विचार करून प्राप्त प्रस्ताव निकाली काढण्याकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

समिती

| अ.क्र. | विद्यापीठ अधिका-याचे नाव | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १. | विद्यापीठ अभियंता | अध्यक्ष |
| २. | उपअभियंता अकोला विभाग / नागपुर विभाग<br>ज्या विभागातील प्रस्ताव आहे त्या विभागाचा सदस्य राहील. | सदस्य |
| ३. | संबधित कार्यालयाचे नियंत्रण अधिकारी यांनी प्रधिकृत केलेला प्रतिनिधी<br>(शाखाधिकारी किंवा त्यावरील पदावर कार्यरत अधिकारी ) | सदस्य |
| ४. | कुलसचिव यांनी प्रधिकृत केलेला प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | ज्या कार्यालयाचा प्रस्ताव असेल त्या कार्यालयाचे कार्यालयप्रमुख | सदस्य सचिव |

..२..

Inward No 84 Dt. 22/05/2024

उपरोक्त समितीने प्राप्त प्रस्तावावर अंतिम निर्णय / शिफारशीसह परिपुर्ण प्रस्ताव संबधित कार्यालय प्रमुख यांनी समिती अध्यक्ष मार्फत मा. कुलगुरू महोदय यांचे मंजुरी करीता सादर करण्यात यावा. मा. कुलगुरू महोदयाचे निर्देश / मंजुरी नंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी.

तसेच प्राप्त प्रस्तावातील सर्व बाबीची पुर्तता करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीमधील सदस्य सचिव यांची राहील व सदस्य सचिव यांनी विषयाकिंत प्रकरणी समिती अध्यक्ष यांचेकडे प्रस्ताव सादर करून समितीचे कामकाज समिती अध्यक्ष व इतर सदस्यांचे समन्वयाने पुढील कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त आदेश विद्यापीठ हितार्थ निर्गमित करण्यात येत असून याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

मा. कुलगुरू यांचे मंजुरीने निर्गमित.

**स्वा/-**

कुलसचिव

डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

**प्रतिलिपी माहिती व उचित कार्यवाहीकरीता -**

१. अधिष्ठाता, कृषि/उद्यानविद्या/ कृषि अभियांत्रिकी, डॉ.पंदेकृवि, अकोला.
२. संचालक, संशोधन / विस्तार शिक्षण, डॉ.पंदेकृवि, अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, डॉ.पंदेकृवि (सर्व------------------------------------------------------
४. विभाग प्रमुख, डॉ.पंदेकृवि, अकोला (सर्व)--------------------------------------------------.
५. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र (सर्व)-----------------------------------------------------.
६. कार्यालय प्रमुख, अ.भा.स.सं. प्र. (सर्व)----------------------------------------------------.
७. वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्र (सर्व)----------------------------------------------------.
८. नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ.पंदेकृवि, अकोला.
९. उपकुलसचिव, विद्याविषयक / सामान्य प्रशासन विभाग, डॉ.पंदेकृवि, अकोला.
१०. मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक/ तांत्रिक सचिव डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
११. मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना माहितीकरीता.
१२. सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१०. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली यंत्रणा डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त आदेश विद्यापीठ संकेत स्थळावर प्रकशित करण्यात यावा.

कुलसचिव,

डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.